**विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम,अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांत रोहयोखाली सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम-लाभार्थी निवडीबाबत..**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्र.रोहयो-२००६/प्र.क्र.१३०/रोहयो-१०,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ मे, २००७.

<u>संदर्भ</u> :- शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५ डिसेंबर,२००६.

<u>प्रस्तावना</u> :-

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांमध्ये शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीकरिता केंद्र व राज्य शासनाने गेल्या २ वर्षात अनेक पावले उचलली आहेत व विशेष पॅकेज पण जाहीर केलेले आहे.

वरील जिल्हयांमध्ये जेथे सिंचनाखालील क्षेत्र राज्याच्या इतर भागापेक्षा कमी आहे, तेथे अल्प कालावधीत विहिरींच्या माध्यमातून सिंचनाखालील क्षेत्र वाढविणे शक्य आहे, असे लक्षात आल्यावर राज्य शासनाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर,२००६ अन्वये ६४,००० सिंचन विहिरींचा एक धडक कार्यक्रम रोहयोखाली घेण्याचे जाहीर केले. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण करण्यात आले असून या समितीने सर्व बाबींचा विचार करुन गाववार विहिरींचा लक्षांक निश्चित करावयाचा आहे. सदर समितीने नुकतेच गाववार लक्षांक निश्चित केलेले आहेत. हया लक्षांकाप्रमाणे आता विहिरी त्वरित तयार करावयाच्या आहेत.

हया धडक कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची निवड व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करावयाची आहे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा सखोल विचार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्हयांतील प्रत्येक तालुक्यात १००० प्रमाणे एकूण ६४,००० सिंचन विहिरींचा कार्यक्रम त्वरीत हाती घेण्यात यावा.

२. दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तयार करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने गावनिहाय लक्ष्यांकानुसार संबंधीत गावातील इच्छुक लाभार्थी शेतकऱ्यांकडून निश्चित कालावधीत अर्ज मागवून घ्यावेत.

३. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने आलेल्या अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांची गावावार यादी तयार करावी. ही छाननी करताना मागासवर्गीय, दारिद्र्य रेषेखालील, लहान शेतकरी, आपदग्रस्त इत्यादि करीता शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या कमकुवत गटांना प्राधान्य मिळेल असे पहावे. छाननी करण्यासाठी निकष जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त, अमरावती, विभागीय आयुक्त, नागपूर व महासंचालक, वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन अमरावती यांचेशी सल्ला मसलत करुन ठरवावे. मात्र हे निकष ठरविताना भूगर्भातील पाण्याची उपलब्धता व त्यांचे होणारे पुनर्भरण इ. सर्व बाबींचा विचार शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात यावा.

४. ज्या गावांमध्ये भूगर्भातील पाण्याची उपलब्धता लक्षात घेता विहिरी घेणे शक्य नसेल तेथे शेततळ्यांची कामे हाती घेण्याची मुभा राहील. मात्र विहिरी व शेततळी या दोघांचे मिळून तालुक्याचा इष्टांक १००० च्या वर होता कामा नये.

५. वरील समितीने निश्चित केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या (विहिरी/शेततळी) यादीमधून मा.पालकमंत्री व मा.संपर्क मंत्री यांनी संयुक्तपणे गाववार लक्ष्यांकाप्रमाणे विहिरी/शेतळींसाठी लाभार्थी अंतिम करावेत.

६. वरील सर्व म्हणजे अर्ज मागविण्यापासून प्रत्येक तालुक्यासाठी १००० प्रमाणे लाभार्थी निवडण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३१ ऑगस्ट,२००७ पर्यंत पूर्ण करावी.

७. मा.पालकमंत्री व मा.संपर्क मंत्री यांनी संयुक्तपणे अंतिम केलेल्या यादीनुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करावेत. मात्र, वरील आदेश निर्गमित करण्यापूर्वी जिल्हाधिकारी यांनी शासनाकडून आवश्यक असलेल्या निधीची खात्री करावी.

८. हा एक धडक व मोठा कार्यक्रम असल्याने एका यंत्रणेमार्फत राबविण्यात अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या कार्यक्रमासाठी अनेक/कोणत्याही शासकीय/ जिल्हा परिषद यंत्रणा राबविण्यास जिल्हाधिकारी यांना मुभा राहील. विहिरी व शेततळी यांची गुणवत्ता चांगली राहील यासाठी

जिल्हाधिकारी यांनी तपासणीची व नियमित आढावा घेण्याची कार्यपध्दती निश्चित करावी व शासनाला वेळोवेळी अहवाल पाठवावेत.

९. हा संपूर्ण कार्यक्रम व्यवस्थित व चांगल्या पध्दतीने राबवून घेण्याची संपूर्ण जबाबदारी महासंचालक, वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन व विभागीय आयुक्त, अमरावती व नागपूर यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कांचन विजयन)
अवर सचिव (रोहयो), नियोजन विभाग.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री,
३. मा.उपमुख्यमंत्री.
४. सर्व मंत्री,
५. सर्व राज्यमंत्री,
६. मा.मुख्य सचिव.
७. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
८. विभागीय आयुक्त, नागपूर/अमरावती
९. महासंचालक, वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन, अमरावती,
१०. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. जिल्हाधिकारी, बुलढाणा अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बुलढाणा अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा,
१३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा ,बुलढाणा अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा
१४. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद ,बुलढाणा अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा
१५. जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी ,बुलढाणा अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा,
१६. सर्व अधिकारी, नियोजन विभाग, रोहयो प्रभाग,
१७. निवड नस्ती, रोहयो-१०.